प्रेस नोट दि.२६/०७/२०१८

**मोबाईल फोन हिसकावणारे दोन सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा गुंडा स्क्वॉड दक्षिण विभागाने केले जेरबंद एक लाख एक्यान्नव हजाराचा माल हस्तगत एकुण आठ गुन्हे उघड**

---

दिनांक – २५/०७/२००१८ रोजी पुणे शहर गुन्हे शाखेकडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागाचे प्रमुख पोनिरी श्री. राम राजमाने हे ते त्यांचे स्टाफसह बंडगार्डन पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पो.ना. अजय उत्तेकर व पो.कॉ. राकेश खुणवे यांना त्यांचे बातमीदाराकडुन बातमी मिळाली की रात्रौ व पहाटेच्या वेळेस प्रवासी व रस्त्याने मोबाईल फोनवर बोलणा-या लोकांच्या हातातील मोबाईल फोन हिसका मारुन चोरुन नेणारे दोन मुले ग्रे रंगाच्या ज्युपिटर मोपेड वरुन पुणे स्टेशन परीसरात पुन्हा मोबाईल फोन चोरी करण्यासाठी पुणे स्टेशन परिसरात येणार आहे. अशी बातमी मिळाल्याने पोलीसांनी पुणे रेल्वे स्टेशन समोरील स्वामी समर्थ मंदिरसमोर रोडवर सापळा लावुन दोन इसमांना पकडुन नाव-पत्ता विचारता त्यांनी आपली नावे **१) रोहीत राजु पवार वय-१९ वर्षे रा.१०१२ भवानीपेठ,गवळीवाडा,कॅम्प पुणे, २) राजु अनिल जाधव वय-२० वर्ष रा.११२२ भवानी पेठ, गाडी आडडा, एडी कॅम्प चौक, पुणे** असे असल्याची सांगीतली, त्यांचेकडे मिळुन आलेल्या ज्युपीटर गाडी व मोबाईल फोनबाबत विचारपुस करता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे देवुन लागल्याने व त्यांनी सदरची गाडी व मोबाईल फोन कोठुन तरी चोरुन आणला असल्याची खात्री झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींना विश्वासात घेवुन तपास करता त्यांनी पुणे स्टेशन, स्वारगेट या भागामध्ये रात्रौ व पहाटेच्या वेळेस मोबाईल फोनवर बोलणा-या इसमांकडील मोबाईल फोन हिसका मारुन चोरल्याचे तपासात निष्पण्ण झाले आहे. चोरलेले मोबाईल फोन त्यांनी आपले ओळखीचे लोकांजवळ दिल्याचे माहीती पोलीसांना दिली आहे . त्यानुसार पोलीसांनी तपास करुन त्यांचे ताब्यातुन एकुण सात अॅन्ड्रॉईड मोबाईल फोन त्यामध्ये गुगल, सॅमसंग, ओपो, एमआय या ब्रँडेड कंपनीचे मोबाईल फोन हस्तगत करण्यात आलेले आहे. पुणे शहरातील मोबाईल फोन जबरदस्तीने चोरुन नेल्याचे आठ गुन्हे उघडकीस आलेले आहे. **आरोपी गुन्हा करण्यासाठी ज्युपिटर मोपेडचा वापर करत होते ती मोपेड व आठ मोबाईल फोन असा एकुण एक लाख ऐक्यान्नव हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे,**

**आरोपी अल्पवयीन असल्यापासुन अशाप्रकारे गुन्हे करत आहे यापुर्वी त्यांना बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे येथे ताब्यात घेण्यात आले होते.** आरोपींकडुन जप्त करण्यात आलेले मोबाईल फोन हे १) स्वारगेट पोलीस स्टेशन गुन्हा रजी नं.२६०/२०१८ २) बंडगार्डन पो.स्टे.गु.र.न.८५/२०१८२)बंडगार्डन पो.स्टे.गु.र.न.१६२/२०१८ ३) बंडगार्डन पो.स्टे.गु.र.न.१९८/२०१८ ४) बंडगार्डन पो.स्टे.गु.र.न.२००/२०१८ ५) बंडगार्डन पो. स्टे. गु.र.न. २०१/२०१८ ६) फरासखाना पो.स्टे.गु.र.न.१२१/२०१८ ७) स्वारगेट पो.स्टे.गु.र.न.२६०/२०१८ असे गुन्हे उघडकीस आलेले आहेत, आरोपींनी अशा प्रकारे हिसकावून मोबाईल चोरी व जबरी चोरीचे गुन्हे केल्याचा संशय आहे, त्या बाबत तपास चालू आहे. **पुढील तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करीत आहेत.**

**सदरची कामगिरी गुन्हेशाखा, पुणे शहराचे श्री. प्रदिप देशपांडे सो- अपर पोलीस आयुक्त, गुन्हे. श्री.पंकज डहाणे सो, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.समीर शेख सो-सपोआ,गुन्हे-१,यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, पोलीस उप निरी श्री.संजय गायकवाड, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, पो.हवा. सुनिल चिखले, विजय गुरव, सर्फराज शेख, अजय उत्तेकर,राकेश खुणवे, किरण ठवरे, प्रविण पडवळ, कैलास साळुके, निलेश शिवतरे, चालक-मगावणे यांनी केली आहे.**


संघटित गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभाग
गुन्हे शाखा पुणे शहर

